Dr. Babasaheb Ambedkar
Marathwada University
Chhatrapati Sambhajinagar-431004
Maharashtra (India)
NAAC Re-accredited 'A' Grade

डॉ. बाबासाहेब आंबेडकर
मराठवाडा विद्यापीठ
छत्रपती संभाजीनगर-४३१००४. महाराष्ट्र (भारत)
नॅक समितीतर्फे 'अ' दर्जा प्राप्त

Telephone
Office PBX : (0240) 2403399/400
C.O.E. : (0240) 2403200
Fax : (0240) 2403199/188
Website : www.bamu.ac.in
http://bamua.digitaluniversity.ac
E-Mail : coe@bamu.ac.in

Office : Director, Board of Examinations & Evaluation

कार्यालय : संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ

संदर्भ : परीक्षा/मुल्यांकन/२०२४/ 126　　　　दिनांक : १०.०५.२०२४

# अंत्यत तातडीचे

**प्रति,**
**प्राचार्य/संचालक,**
**सर्व संबंधित अभ्यासक्रमांचे महाविद्यालय/परिसंस्था,**
**(सर्व पदवी, पदव्युत्तर, शिक्षणशास्त्र, शारीरिक शिक्षणशास्त्र, विधी, अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र व इतर अभ्यासक्रम)**
**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,**
**छत्रपती संभाजीनगर.**

Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University * Chhatrapati Sambhajinagar * Examinations

**विषय : एप्रिल/मे, २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या व येणाऱ्या सर्व पदवी, पदव्युत्तर, शिक्षणशास्त्र, शारीरिक शिक्षणशास्त्र, विधी, अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र व इतर अभ्यासक्रमांच्या उत्तरपत्रिका मुल्यांकनाकरिता सर्व नियमित, कंत्राटी व तासिका तत्वावरील अध्यापकांना पुर्ण वेळ कार्यमुक्त करणेबाबत.**
**संदर्भ : पत्र क्र. परीक्षा/भांडार/२०२३-२४/१६३८, दि. २७.०३.२०२४.**

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयी व संदर्भिय पत्राच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, उन्हाळी-२०२४ च्या एप्रिल/मे, २०२४ मध्ये होणाऱ्या पदव्युत्तर, विधी, शिक्षणशास्त्र, शारीरिक शिक्षणशस्त्र व इतर अभ्यासक्रमांच्या परीक्षा सुरु झालेल्या आहेत व काही अभ्यासक्रमांच्या परीक्षा अनुक्रमे दि. १५.०५.२०२४ व १६.०५.२०२४ रोजी पासुन सुरु होणार आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६ मधील तरतुदीनुसार सर्व अभ्यासक्रमांचे निकाल ३० दिवसांत जाहीर करणे बंधनकारक आहे. तसेच निकाल विहित वेळेत जाहीर करण्यात यावेत असे निर्देश मा. कुलपती कार्यालयातुन विद्यापीठांना वेळोवेळी प्राप्त होत आहेत. तसेच निकाल वेळेत जाहीर होण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात यावेत. विद्यार्थ्यांच्या पुढील संधी निकालावर अवलंबून असल्याने यासाठी सर्वच माध्यामातून सहकार्याची व सकारात्मक दृष्टिकोनातुन उत्तरपत्रिका मूल्यांकनाचे कार्य पार पाडण्याची अपेक्षा आहे.

Bhat

**कृ.मा.पहा**

विद्यापीठ प्रशासनामार्फत सर्व संलग्नित महाविद्यालयातील शिक्षकांना व प्राचार्यांना वारंवार आवाहन करण्यात येऊनही बरचशे अध्यापक मूल्यांकन केंद्र रुजू होत नसल्याची माहिती विद्यापीठास प्राप्त होत आहे. त्यामुळे याचा परिणाम विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवर व त्यांच्या पुढील भवितव्यावर होत आहे. याच बाबीची गंभीर दखल घेऊन परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या दि. १५.०३.२०२४ रोजीच्या बैठकीत या विषयावर संखोल चर्चा अंती उन्हाळी-२०२४ च्या एप्रिल/मे, २०२४ मध्ये होणाऱ्या सर्व पदवी, पदव्युत्तर, शिक्षणशास्त्र, शारीरिक शिक्षणशास्त्र, विधी, अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र व इतर अभ्यासक्रमांच्या परीक्षेसाठी सर्व संलग्नित महाविद्यालयाच्या प्राचार्यंनी ज्या विषयांच्या परीक्षा संपतील त्या-त्या विषयांच्या अध्यापकांना उत्तरपत्रिका मूल्यांकनासाठी पुर्णवेळ १५ दिवसांकरिता मूल्यांकन केंद्रावर उत्तरपत्रिका मूल्यांकनासाठी कार्यमुक्त करण्यात यावे, असे निर्देश दिले आहेत.

**तसेच प्राचार्यांनी त्यांच्या महाविद्यातील शिक्षकांना उत्तरपत्रिका मूल्यांकनासाठी कार्यमूक्त केल्यानंतर मूल्यांकन केंद्रांनी अध्यापक रुजू झाल्याबाबतचा एकत्रित अहवाल dcasunit.exam@bamu.ac.in या ई-मेलवर सादर करुन त्याची एक प्रत कस्टोडियन, मूल्यांकन केंद्र यांनी प्रमाणित करुन मूल्यांकन कक्ष, परीक्षा व मूल्यमापन विभाग, विद्यापीठ परिसर यांना सादर करण्यात यावी.**

सदरील बाब विद्यार्थ्यांच्या हिताच्या दृष्टिने महत्वाची असल्याने याबाबीचे गांभीर्य लक्षात घेऊन उत्तरपत्रिका मूल्यांकन पारदर्शीपणे करण्याबाबत सहकार्य करावे.

करिता, सर्व संबंधितांना आवाहन करण्यात येते की, उत्तरपत्रिका मूल्यांकनाची सर्व संलग्नित महाविद्यालये/परिसंस्था तसेच विद्यापीठाची सामुहिक जबाबदारी व कर्तव्य असल्याने उन्हाळी-२०२४ परीक्षांचे सर्वांच्या सहकार्याने विहित वेळेत उत्तरपत्रिका मूल्यांकन करण्यात येऊन ३० दिवसांच्या आत निकाल जाहीर करण्यासंबधी सर्वांनी सामुहिकरित्या सहकार्य करावे, ही विनंती.

Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University ★ Chhatrapati Sambhajinagar ★ Examinations

**प्रा. (डॉ.) भारती गवळी**
**संचालक**
**परीक्षा व मूल्यमापन मंडळ**

**यापत्राची प्रत :**

१. मा. कुलगुरु महोदयांचे स्विय सहायक, प्रस्तुत विद्यापीठ यांना माहितीस्तव
२. मा. प्र-कुलगुरु महोदयांचे स्विय सहायक, प्रस्तुत विद्यापीठ यांना माहितीस्तव
३. संचालक, सर्व संबंधित क्षेत्रिय व जिल्हा मुल्यांकन केंद्र यांना देण्यात येऊन कळविण्यात येते की, आपल्या कार्यक्षेत्रातील पदवी व पदव्युत्तर महाविद्यालयातील किती अध्यापक उत्तरपत्रिका मुल्यांकनाकरिता उपस्थित किंवा अनुपस्थित आहेत याबाबतचा सविस्तर अहवाल या कार्यालयास सादर करण्यात यावा.
४. जनसंपर्क अधिकारी, प्रस्तुत विद्यापीठ यांना माहितीस्तव तथा पुढील कार्यवाहीस्तव.